सत्यमेव जयते

# देवेंद्र फडणवीस

**विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा**

दि.:- ३१ ऑगस्ट, २०२०

प्रति,

**मा. श्री. उद्धव ठाकरे *जी,***
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**सप्रेम नमस्कार!**

**विषयः- वीज कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांबाबत.**

महोदय,

श्री. निलेश खरात, अध्यक्ष, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ, पुणे यांचे दि. २८/०८/२०२० चे निवेदन या सोबत जोडले आहे.

सन २००५ पासून राज्यातील महावितरण वीज कंपनीमध्ये नियमित रिक्त असलेल्या विविध पदावर जवळपास आजतागायत ७००० कामगारांची शासनाचे नियम डावलून कंत्राटी पध्दतीने भरती करण्यात आलेली आहे. यामुळे कंत्राटी कामगारांवर बेरोजगाराची वेळ येऊ नये. तसेच कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असतांना सुध्दा जीवाची पर्वा न करता हे कामगार वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आपले कर्तव्य बजावत आहेत. श्री. खरात यांनी कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांना न्याय मिळावा अशी विनंती केलेली आहे.

तरी श्री. खरात यांनी वीज कंपनीमधील कंत्राटी कामगारांच्याबाबत सादर केलेल्या विविध मागण्यांबाबत सहानुभूतीपुर्वक विचार व्हावा, ही विनंती.

**धन्यवाद,**

आपला,

**सोबत-वरील प्रमाणे**

**(देवेंद्र फडणवीस)**

**कार्यालय :** १३३, पहिला मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२
**टेलीफोन :** ०२२-२२०२ ३५५३, **फॅक्स :** ०२२-२२०२ ८८१६

।। श्रम ही आराधना ।।

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ) (र.नं.पी.एन.३१७८)

| निलेश खरात | सचिन मेंगाळे | उमेश आणेराव | राहुल बोडके | सागर पवार |
|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | सरचिटणीस | कार्याध्यक्ष | संघटन मंत्री | कोषाध्यक्ष |
| मो.: ९८२२४१८३१५ | मो.: ९४२२०३७०२१ | मो.: ९९७०००४४७४ | मो.: ९५५२८७४८२१ | मो.: ९८९०१६९६६७ |

● mvkksangh@gmail.com ● विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० ● www.mvkksangh.com


Ref : 288 Date : 28/08/2020

प्रती

**मा. देवेन्द्रजी फडणवीस**

**विरोधीपक्ष नेते, महाराष्ट्र राज्य**

**विषय : वीज कंत्राटी कामगारांना न्याय मिळावा या करीता मध्यस्ती करणे बाबत.**

सप्रेम नमस्कार

राज्यातील महावितरण या वीज कंपनीतील लाईनमन, सबस्टेशन ऑपरेटर, लिपिक, शिपाई, मीटर रीडर, सुरक्षा रक्षक या काही नियमित पदांच्या रिक्त पदांवर शासनाने स्वत: बनवलेले कायदे मोडून या उद्योगात या रिक्त पदांवर कंत्राटी कामगार नियुक्त केले ,या मुळे या वीज कंपन्यांचे आजवर अब्जावधी रुपये वाचले खरे मात्र या कष्टकरी वीज कंत्राटी कामगारांना काय मिळाले ? तर कंत्राटदार व अधिकारी यांचे संगनमतातून आजवर सुरू असलेली आर्थिक व मानसिक पिळवणूक, कंपनीच्या महसूल वाढी साठी प्रयत्नशील असताना जनतेच्या, शिव्या, मार, वैमनस्य, आमचे अपघात व मृत्यू , व मुख्य म्हणजे आमच्या कुटुंबाची हेळसांड, व ससेहोलपट जी 2005 पासून आज ही तशीच आहे. गरज सरो व वैद्य मरो असे दुटप्पी धोरण ठेवत 7000 कंत्राटी कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे येऊ नये, कोणाचे रोजगार बुडू नये,या कोरोना सारख्या महामारी काळात स्वत:चा जीव धोक्यात घालत, ऊन, वादळ,वारा, पावसात आम्ही कामगारांनी जीवाची तमा न बाळगता जनतेला अखंडित व सुरळीत वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यास मदत केली, आमचे 21 कामगार बांधव शहीद झाले, आम्ही रक्तदान शिबीर घेतले तसेच मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये 1 लाख रुपये जमा करून मानवतावादी दृष्टिकोन देखील जोपासला.

आम्हा कामगारांच्या न्याय्य रास्त व माफक अपेक्षा खालील प्रमाणे आहेत या सरकार त्या पूर्ण कराव्यात हीच अपेक्षा.

1 ) आज रोजी महावितरण मध्ये कार्यरत असलेल्या अनुभवी वीज कंत्राटी कामगारांनाच जास्तीत जास्त प्राधान्य देऊन सामावून घ्यावे

2 ) भरती मेरीट दहावीच्या मार्कांनुसार न लावता ITI च्या मार्कनुसार करावे.

3 ) शासनाच्या इतर खात्यानुसारच वीज उद्योगात देखील वयाचे निकष ठेवावेत.

4 ) शिकाऊ उमेदवारांना जसे विशेष आरक्षण दिले तसेच स्वतंत्र आरक्षण या वीज कंत्राटी कामगारांना मिळून जेवढे वर्षे काम केले तेवढी वयात सूट मिळावी.

5 ) भरतीला आमचा विरोध नाही जर 25000 जागा रिक्त असतील तर एक ही कामगार घरी जाणार नाही याची लिखित खात्री शासनाने द्यावी.

6 ) तो पर्यंत इथून पुढे कंत्राटी कामगार पद्धत कायमची बंद करून आज रोजी कार्यरत सर्व कामगारांना कंत्राटदार विरहित व वयाच्या 58 वर्षापर्यंत शाश्वत रोजगार द्यावा या मुळे वीज कंपनीचे 25% रुपये वाचून अब्जावधी रूपयांचा फायदा होईल व हे कामगार अधिक जोमाने काम करतील.

या सर्व प्रलंबित न्याय मागण्या साठी मागील अनेक वर्षे राज्यातील वीज कंत्राटी कामगार हे संघर्ष करत असून आता तरी न्याय मिळावा ही आमची अपेक्षा आहे. तरी आमचे लोकप्रतिनिधी या नात्याने आपण या अत्यंत संवेदनशील व ज्वलंत प्रश्नांत विशेष बाब म्हणून तातडीने लक्ष घालून, आम्हा अन्यायग्रस्त वीज कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून द्यावा. आणि या विषयात अंतरिम तोडगा निघेपर्यंत महावितरण ची जाहीर भरती प्रक्रिया स्थगित ठेवावी अशी सूचना आपण ना.उर्जामंत्री डॉ.नितीनजी राऊत महोदयांना करावी. चर्चा व संवादातून प्रश्न सुटतात यावर आमचा विश्वास आहे, तरी आपल्या मध्यस्थीने मा.ऊर्जामंत्री यांच्या सोबत महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या शिष्टमंडळाची या विषयावर त्वरित चर्चा व्हावी, ही माफक अपेक्षा असून असे न झाल्यास संघर्ष अटळ राहून राज्यातील सर्व वीज कंत्राटी कामगार नाईलजास्तव पुन्हा आपल्या न्याय हक्का साठी प्रश्न तडीस निघण्यासाठी आंदोलनाची भूमिका घेतील.

आपला


अध्यक्ष
निलेश खरात
महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ.
Mob.: 9822418395

सरचिटणीस
सचिन मेंगाळे
महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ.
Mob.: 9422037029

।। श्रम हा आराधना ।।

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ) (र.नं.पी.एन.३१७८)

| निलेश खरात अध्यक्ष | सचिन मेंगाळे सरचिटणीस | उमेश आणेराव कार्याध्यक्ष | राहुल बोडके संघटन मंत्री | सागर पवार कोषाध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| मो.: ९८२२४१८३९५ | मो.: ९४२२०३७०२९ | मो.: ९९७०००४४७४ | मो.: ९५५२८७४८२१ | मो.: ९८९०१६९६६७ |

● mvkksangh@gmail.com ● विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० ● www.mvkksangh.com

Date :08/06/2020

प्रति
मा. देवेंद्रजी फडणवीस
मा. विरोधीपक्षनेता, विधानसभा
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषय : वीज उद्योगात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांवर होत असलेल्या अन्यायाबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र राज्यातील महावितरण, महापारेषण, महानिर्मिती कंपनीमध्ये रिक्त पदांवर व कामाच्या गरजेप्रमाणे गेल्या १२-१५ वर्षांपासून कंत्राटी कामगार सातत्याने नियमितपणे कार्यरत आहे. राज्यभरात महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे बहुतांश सभासद आहेत. या कामगारांना उद्योगांचे किमान वेतन व आपल्या सरकारच्या कार्यकाळात वीज कंपनी कडून २० टक्के पुरक भत्ता मिळून आता साधारण १४२०० रुपये प्रति महा वेतन मिळत आहे. आपल्या सरकारच्या कालावधीत तत्कालिन उर्जामंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समवेत प्रशासन व संघटना पदाधिकारी यांची अनेक वेळा चर्चा होऊन या कामगारांकरीता किमान वेतनात वाढ आणि कंपनीच्या वतीने २० टक्के वेतनात वाढ ही प्राप्त झाली आहे. या कामगारांना रोजगारात स्थैर्य प्राप्त व्हावे यासाठी तत्कालिन उर्जामंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी रानडे व भाटीया समिती नियुक्त केली होती या माध्यमातून त्यांनी कंत्राटी कामगारांना रोजगारात स्थैर्य व समान काम समान वेतना साठी सकारात्मक प्रयत्न केला होता.

या विषयी संघटनेने मा. उर्जामंत्री मा. नितीनजी राऊत व कंपनी प्रशासन यांना अवगत केलेले आहे. परंतू अद्याप संघटनेशी चर्चा वाटाघाटी आयोजित केल्या नाहित.

कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी शासनाचे व प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी संघटनेने दिनांक ८/६/२०२० रोजी उर्जामंत्री व वीज कंपनी प्रशासनास लेखी नोटीस दिली आहे. पण अद्याप पर्यंत कोणतीही चर्चा संघटने सोबत झालेली नाही. दरम्यान २३ जून २०२० रोजी मा. उर्जामंत्री नितीन राऊत यांनी महावितरण कंपनी मध्ये ७००० उमेदवारांच्या भरती प्रक्रियेची यादी आठ दिवसात लावण्याचे आदेश प्रशासनास दिलेले आहेत. त्यामुळे या रिक्त पदांवर वर्षानुवर्षे काम करणाऱ्या ७००० कंत्राटी कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणार आहे.

या निर्णयामुळे सर्व कामगारांच्या मनात महाराष्ट्र शासन व वीज कंपनी प्रशासना प्रती तीव्र नाराजी निर्माण झालेली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर संघटनेने दिलेल्या नोटीसी प्रमाणे दि. ७ जुलै २०२० पासुन सुमारे २२००० वीज कंत्राटी कामगार बेमुदत काम बंद आंदोलन करणार आहे. तरी कृपया आपण या विषयात लक्ष घालून या कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून द्यावा ही विनंती.

आपला नम्र

सरचिटणीस
सचिन मेंगाळे
महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ.